# बंडखोरांचा उद्भव

**-अरुण जेटली**
विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

निवडणुकांचा कालावधी आहे आणि या वेळी वास्तविक पाहता आम्ही निवडणुक प्रचारात व्यस्त आहोत. सर्व राजकीय पक्ष आपल्या निवडणुक प्रचाराची तयारी करणे, युती कायम करणे, उमेदवार घोषित करणे आणि निवडणुक रणनीतीला अंतिम स्वरुप देण्यात मग्न आहेत. सामग्री एकत्रित करणे आणि प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मिडीयासाठी प्रचार सामग्री तयार करण्यात ताकद लावली जात आहे. मोठ्या संख्येत पांढरपेशी लोकांनी निवडणुकांदरम्यान राजकारणाचा रस्ता धरला आहे. ही एक सकारात्मक प्रवृत्ती आहे. ते राष्ट्र निर्माणासाठी योगदान देण्याच्या भावनेने प्रेरित झाले आहेत. वेगवेगळे पक्ष हे चित्रपट अभिनेते आणि अभिनेत्री, खेळाडू कोणत्याही क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्यांना जोडण्यास मग्न झाले आहेत आणि काही ठिकाणी तर त्यांना उमेदवार सुद्धा बनविण्यात आले आहे. हा ऋतू खुप लोकांसाठी पक्ष बदलण्याचा सुद्धा आहे. निवडणुकीदरम्यान एका पक्षातून दुस-या पक्षात जाणे अथवा पक्ष बदल करणे म्हणजे राजकीय ताकदीचे दुस-यांदा ध्रुवीकरण आहे असे बोलले जाते.

बंडखोरांसाठी निवडणुक एक चांगली संधी असते. एक बंडखोर स्वतःच्या विचारासाठी आणि कार्यासाठी स्वतंत्र असतो. तो विवादास्पद नियमांना बांधील नसतो. तो सामान्य नागरिक असतो. तो धडाकेबाज असतो आणि कधी कधी विचित्र पण असतो. तो असे सर्व मार्ग जाणत असतो जेणेकरुन लोकांचे लक्ष वेधून घेता येईल. त्याला अदला-बदली करण्यात कोणताही पश्चाताप होत नाही. तो परंपरागत राजकीय नेत्यांच्या तुलनेत इलेक्ट्रॉनिक मिडीयात अधिक रंगीतदार दिसून येतो. सोशल मिडीया खासकरुन ट्विटर वर बंडखोरांचे विचार मांडण्यासाठी करण्यासाठी खुप जागा आहे. अनेक बंडखोर आवाज-गोंधळ घालण्यासाठी प्रतिबद्ध असतात. ते असे कारण शोधत असतात ज्याला ते आश्रय देऊ शकतील.

बंडखोर किंवा मैवरिक शब्दाची उत्पत्ती सॅम्युअल अगस्टस मैवरिक यांच्या नावावरुन झाली जे 19 व्या शताब्दीत दक्षिण कैरोलीनात जमीनीचे तालुकेदार आणि एक आमदार होते. त्यांनी आपल्या जीवनाची सुरुवात भुमी तालुकेदाराच्या रुपाने केली आणि आपल्या वडिलांचा व्यवसाय सांभाळला आणि त्यानंतर कायद्याचा अभ्यास करुन एक लॉ ऑफिस उघडले. टेक्सास क्रांती दरम्यान त्यांना घरी नजरकैदेत ठेवण्यात आले होते. ते टेक्सासचे महापौर राहिले आणि अनेक निर्वाचित कार्यालयात ते राहिले. त्यांच्याजवळ काही गोधन होते ज्यांना फिरण्याची अनुमती दिली आणि मैवरिक शब्दाचा तात्पर्य बिना ब्रांडच्या वासराशी संबंधित आहे.

भारतात आपापल्या पद्धतीचे मैवरिक आहेत. अनेक स्वतंत्र विचाराचे लोक काही वेळाकरिता पक्षात शामिल होतात आणि नंतर स्वतःला मिसफीट समजतात. काहींनी राजकीय पक्ष स्थापन केला आहे. त्यांची पद्धत अपरंपरागत आहे. ते उखाण्यातून युक्तीवाद करतात ज्यांचा इरादा अधिकाधिक प्रसिद्धी मिळविणे आहे. कोणत्याही मैवरिकची कोणत्याही ठोस पुराव्याशिवाय आरोप करण्याची सवय असते. परंपरागत राजनीतिज्ञांना त्यांच्या मुद्दयात कोणती खास गोडी नसते कारण एक बंडखोर किंवा मैवरिक पाठीमागून वार करतो. तो वाईल्ड कार्ड असतो.

मी नेहमी विचार करतो की बंडखोरांपासून कसे निपटले जाऊ शकते. काय तुम्ही त्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकतात जे बंडखोर तुम्हाला विचारतील? काय तुम्ही त्यांना भेटाल जर ते जबरदस्तीने दरवाजा तोडून तुमच्या घरात शिरतील? काय तुम्ही त्याच्याशी स्वतःला बांधून ठेवून त्याला केंद्रात ठेवणार कि त्याच्याकडे दुर्लक्ष करुन आपला अजेंडा ठरवण्याची परंपरागत पद्धत सुरु ठेवाल? मला वाटते हाच सुरक्षित असा पर्याय आहे. कोणत्याही बंडखोराबद्दल गप्प राहणेच सर्वात चांगले उत्तर असू शकते. गप्प राहणे हे गौरवाचे असते. ते आपल्याला कोणत्याही बंडखोराला विचित्र अजेंडा मध्ये गुंतवून होणा-या त्रासापासून वाचवते.

नरेंद्र मोदी यांना अरविंद केजरीवाल यांच्या दर्शकांपासून वाचण्याचा सल्ला देण्यात आला आहे.